**<u>रे.दि.मु. क्र. ३९४/२००६.</u>**
(गोविंद देशपांडे विरुध्द तानाजी शिंदे वगैरे)
**CNR No.MHST07-002506-2006.**

## नि.११२ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ६ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्ज वाचला. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा जाहीर ठरावाकरीता केलेला आहे. तसेच दाव्यामध्ये तद्अनुशंगिक दाद म्हणून निरंतर ताकीदीची मागणी केलेली आहे. दाव्यास प्रतिवादी क्र. १ ते ६ चे पुर्वहक्कदार मयत प्रतिवादी तानाजी शिंदे यांनी निशाणी क्र.२९ कडे दि. १२/०३/२००७ रोजी कैफियत दिली आहे. सदरची कैफियत प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दि. १/११/२०१९ रोजी स्वीकृत केलेली आहे. निशाणी क्र. २९ कडील कैफियतीमध्ये, प्रतिवादींना दि. ३०/०७/१९४६ रोजी बक्षिसपत्राने आण्णा, महादू, तुकाराम, दौलता शिंदे यांचे कडून कब्जे वहिवाटीस वाद मिळकती मिळाल्याचे व सदर ठिकाणी प्रतिवादी क्र. ३ मुला समवेत राहतात असे कथन केले आहे. परंतु मयत प्रतिवादी तानाजी हे अल्पशिक्षीत असल्यामुळे व कायदयाचे अज्ञानामुळे निशाणी क्र.२९ कडील कैफियत देतेवेळी त्यांना वाद मिळकतीच्या मुळ स्त्रोताबाबत कागदपत्रे व माहिती देता आली नाही. त्यामुळे सदर कैफियतीमध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

०३. प्रस्तावित दुरूस्ती आधारे प्रतिवादींनी दावा कलम ५अ, ५ब, ५क, ५ड व ५इ अशी जास्तीची कलमे नमुद करून त्यामध्ये अधिक माहिती व नवीन दुरूस्ती करण्याची परवानगी मागितलेली आहे.

०४. प्रस्तुत अर्जास वादी क्र.१ तर्फे म्हणणे दाखल करण्यात आले असून त्यांनी अर्जातील संपूर्ण कथने अमान्य केली आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार प्रस्तुत अर्ज दावा चौकशीस लागणेपूर्वी का दिला नाही याचे योग्य ते कारण नमूद करून झालेल्या विलंबाबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. निशाणी क्र. २९ कडील कैफियतीमध्ये मुळ प्रतिवादीने ते वाद मिळकीचे मालक आहेत असा बचाव मांडला आहे. त्याप्रमाणे वादीने न्यायालयात स्वतःचा पुरावा दिलेला आहे. सदर कैफियतीमधील मुळ प्रतिवादीचे बचावास पुर्णतः छेद देऊन हे प्रतिवादी वाद

मिळकतीमध्ये कुळहक्क असल्याचे व कृषकदिनी कुळ वहिवाट असल्याचे मालक झाल्याचे कथन करू पाहत आहेत. प्रस्ताविक दुरूस्ती ही पूर्वीचा बचाव बदलणारी आहे. दावा चौकशीस लागलेला असून अत्यंत विलंबाने संपूर्णपणे कैफियत बदण्याची संधी प्रतिवादींना मागता येणार नाही. सबब या सर्व कारणांस्तव अर्ज नामंजूर करण्याची वादी क्र.१ ने विनंती केलेली आहे.

०५. वादी क्र. २,३ व ४ यांनी अर्जास म्हणणे दिलेले नाही.

०६. वादी क्र. १ व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

०७. प्रस्तुतकामी मुळ प्रतिवादी तानाजी मयत झालेवर निशाणी क्र. ६१ वरील आदेशान्वये या प्रतिवादींना दाव्यात सामील करण्यात आलेले आहे. दि. ३०/०९/२०१३ रोजी त्यांना आदेशिका मिळाल्या. तद्नंतर ते दि. २०/०२/२०१४ रोजी वकीलांमार्फत हजर राहिले आहेत. दि. ११/११/२०१९ रोजी निशाणी क्र. १११ कडे पुरसिस देऊन त्यांनी कैफियत निशाणी क्र. २९ स्वीकृत केल्याचे कळविले आहे.

०८. प्रतिवादी सन २०१४ मध्ये दाव्यात हजर होऊनही सन २०१९ पावेतो म्हणजे सुमारे पाच वर्षे त्यांनी दाव्यात कैफियत देणेबाबत तजविज केली नाही. निशाणी क्र.१९ कडील कैफियत पाहता मुळ प्रतिवादीने ते वाद मिळकतीच्या कब्जे वहिवाटीत बक्षीसपत्राने मालकी हक्काने असल्याचे कथन आहे. प्रस्तुत अर्जामध्ये या प्रतिवादींनी वाद मिळकतीमधील त्यांचे हक्क हितसंबंधांबाबत केलेली कथने ही मुळ कैफियती पेक्षा वेगळी व विसंगत आहेत. प्रस्ताविक दुरूस्तीद्वारे हे प्रतिवादी वाद मिळकतीमध्ये सन १९५७ चे कृषक दिनापासून कुळ कब्जे वहिवाट असल्याचे कथन करीत आहेत. यावरून प्रतिवादी त्यांच्या बचावातील कथनांमध्ये बदल करत आहेत हे स्पष्ट दिसून येते. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींचा पुरावा संपलेला आहे. दावा प्रतिवादींच्या पुराव्यास नेमलेला असताना सदरचा अर्ज दिलेला आहे.

०९. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादींनी कोठेही बचावाबाबतची नवीन माहिती कधी मिळाली व ती पूर्वी का मिळू शकली नाही याबाबतचे कोणतेही कथन केलेले नाही. निशाणी क्र. १११ कडे प्रतिवादींनी मुळ कैफियत स्वीकृत केली असताना कोणत्याही आधारा शिवाय व विलंबाचे संयुक्तीक कारणाशिवाय मागितलेली प्रस्थाविक दुरूस्ती दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे परंतुकास छेद देणारी आहे. त्यामुळे अर्जास दिवाणी प्रक्रिया संहित

आदेश ६ नियम १७ च्या गृहीतकाची बाध येते. या कामी वादीतर्फे सादर करण्यात आलेल्या २०२० (१) म.लॉ.जरनल, १४३ एम. रेवण्णा विरूध्द अंजनाम्मा मधील निरीक्षणांनुसार " जर दुरूस्तीद्वारे संपुर्णतः वेगळी, नवीन व विसंगत हकीकत मांडली जात असेल व त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरूपास आव्हान दिले जात असेल तर दुरूस्तीची परवानगी नाकारणे योग्य आहे."

१०. प्रस्तुत अर्जामध्ये वर चर्चिल्याप्रमाणे हे प्रतिवादी मुळ कैफियतीतील कथनांपेक्षा वेगळा बचाव मांडू पहात आहेत. तसेच प्रस्ताविक दुरूस्ती अत्यंत विलंबाने मागितलेली असून विलंबाबतचे कोणतेही कारण नमूद केलेले नाही. कोणत्याही योग्य व संयुक्तिक कारणाशिवाय वादीने मागणी केलेली दुरुस्ती सदर तरतुदीस अनुसरुन मान्य करता येणार नाही. उपरोक्त सर्व कारणांचा विचार करता अर्ज नामंजूर होणेस पात्र असलेने मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज (नि.११२) नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात मोजण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Aarti Arunkumar Kulkarni
Date: 2020.02.17 10:33:02 +0530

ठिकाण :- कराड.
दिनांक :- १५/०२/२०२०.

(आरती कुलकर्णी)
५वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कराड.